Val II, Issue:VIII, Sept 2012

ISSN : 2230-7850

# Indian Streams Research Journal

Impact Factor 0.2105

## Monthly Multidisciplinary Research Journal



Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N. Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 8, Sept 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# हिंदू भक्ती संप्रदायांतील नवप्रवाहांचे स्वरुप : एक समाजशास्त्रीय अध्ययन

*भालचंद्र देविदास पाटील*

सहायक प्राध्यापक (समाजशास्त्र) गि.द.म.कला,के.रा.न. वाणिज्य व
म.धा.विज्ञान महाविद्यालय,जामनेर जि.जळगांव

***सारांश :–***

वर्तमान काळातील भारतीय समाज धार्मिकदृष्टया एका स्थित्यंतरातून जात आहे. भारतीय समाजात अस्तित्वात असलेल्या पारंपारिक भक्ती संप्रदायांची जागा बऱ्याच मोठया प्रमाणात 1970–80 च्या दशकापासून नव्याने वाढीस लागलेल्या नवधार्मिक संघटना किंवा नवभक्तीमार्गांनी घेतल्याचे दिसते. सत्संग, निरुपण, कथा सप्ताह, पारायण, ध्यान, योगशिबिरे, इ. कार्यक्रमाचे मोठया प्रमाणावर आयोजन होतांना दिसते. मोठया शहरांपासून ते ग्रामीण भागापर्यंत हे लोण पसरलेले आहे. विविध धार्मिक दूरचित्रवाहिन्यांवरुन हया नवभक्ती मार्गांच्या कार्यक्रमांचे अखंडपणे प्रसारण सुरु असते. हया सर्व वातावरणाचा धार्मिक व एकंदरच सामाजिक जीवनावर प्रभाव पडत आहे. समाजात नवीन श्रध्दास्थाने व त्यांच्यायोगे नव्या श्रध्दा रुजत आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये हया नवभक्तीमार्गांच्या स्वरुपाचे विवेचन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांची काही ठळक वैशिष्टे वर्णिलेली आहेत. यादृष्टीने हया नवभक्ती मार्गांच्या विविध कार्यक्रमांचे निरिक्षण, सहभागी निरिक्षण, अनुयायांशी चर्चा (मुलाखती) इ. माध्यमांचा उपयोग संशोधन पध्दतीसाठी करण्यात आला होता. जळगाव जिल्हयातील जामनेर तालुक्याचे क्षेत्र या दृष्टीने निवडण्यात आले होते.

*श*

***पारिभाषिक शब्द :***

नवभक्तीमार्ग, अनुयायी, गुरुवाद, शक्तिपात, कुंडलिनी, सुदर्शन क्रिया, नामस्मरण इ.

जागतिकीकरण, उदारीकरण तसेच माहिती तंत्रज्ञानातील प्रगती यांच्यामुळे संपूर्ण जगात परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने सुरु झालेली आहे. भारतीय समाजावर देखील हया परिवर्तनाच्या खुणा उमटू लागल्या आहेत. भारत देखील आपल्या संपूर्ण क्षमतेने हया परिवर्तन प्रक्रियेत सहभागी होत आहे आणि नव्या बदलांना आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत आहे. राजकीय, आर्थिक आणि वैज्ञानिक स्तरांवर हया परिवर्तनाची चिन्हे अत्यंत ठळकपणे अंकित झालेली दिसताहेत. सामाजिक क्षेत्रात मात्र सदर परिवर्तनाचा वेग आर्थिक व राजकीय क्षेत्रापेक्षा तुलनेने कमीच असल्याचा जाणवतो. समाजावर मोठया प्रमाणात आपल्या प्रभावाचा ठसा उमटविणाऱ्या धार्मिक क्षेत्रात देखील प्रचंड उलथापालथ झाल्याचे निदर्शनास येते. विशेषतः हिंदू भक्ती संप्रदायांचा विचार करता नानाविध नवप्रवाहांचा उदय गेल्या पंचवीस–तीस वर्षामध्ये झाल्याचे दिसून येते. आज तर हया नव प्रवाहांची संख्या शेकडोंमध्ये असावी असे वाटते. हया नवप्रवाहांतील काही संघटन हे राष्ट्रीय, राज्य, स्थानिक पातळींवर कार्यकरतांना दिसतात तर काही आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील कार्यरत आहेत.

हिंदू नवभक्तीप्रवाहांचा निश्चितपणे हिंदू समाजावर विविध अंगांनी मोठयाप्रमाणात ठसा उमटत आहे. एक नवधार्मिक आंदोलनच जणू काही हया भक्तीमार्गांच्या रुपाने उभे राहिले आहे. समाजातील अर्थकारण, राजकरण, समाजकारण इतकेच नव्हे तर व्यक्तीचे वैयक्तिक जीवन देखील हया प्रवाहांनी प्रभावित झालेले आहे. व्यक्ती जीवनातील श्रध्दास्थानांची पारंपारिक जागा नव्याने उदयास आलेली श्रध्दास्थाने घेतांना दिसत आहेत. धार्मिक जीवनात नवे आदर्श लोक स्वीकारतांना दिसत आहे. श्रध्दांबरोबरच हळूवारपणे व्यक्तीपूजा आणि त्यायोगे अंधश्रध्दादेखील उदयास आलेल्या आहेत. कट्टरता, कर्मठता, स्वसमूहश्रेष्ठतावाद, इ. टोकाच्या भावना देखील नवी रुपे धारण करुन पुढे येतांना दिसत आहेत. सांप्रदायिक एकतेच्या रुपाने विविध जातींचे लोक एकत्रित येतांना दिसतात परंतू स्वजातीयनिष्ठेची व इतकेच नव्हे तर हिंदू समाजात मूलतः आढळणाऱ्या स्तरीकरण संरचनेची मानसिक स्वीकृती मात्र तशीच असल्याचे दिसून येते.

**Please cite this Article as :** *भालचंद्र देविदास पाटील* **,** *हिंदू भक्ती संप्रदायांतील नवप्रवाहांचे स्वरुप : एक समाजशास्त्रीय अध्ययन*
**: Indian Streams Research Journal (Sept. ; 2012)**

नवभक्ती प्रवाहांच्या अनुयायांमध्ये स्वतःच्या भक्ती मार्गाविषयी व त्याच्या प्रमुखांविषयी कमालीची तीव्र आस्था दिसते. ही तीव्रता कट्टरतेचे रुप कधी घेते हे लक्षात देखील येत नाही. पारंपारिक धर्म संप्रदाय व प्रस्तुत नवप्रवाह यांच्यामध्ये तणाव देखील निर्माण होतो. नवप्रवाह आणि त्यांचे अध्वर्यू यांना अजिबात न मानणारा मोठा वर्ग देखील समाजात आहे.  आज भारतात अशा नव भक्तीमार्गांना सुगीचे दिवस आलेले आहेत. लक्षावधीच्या संख्येने हया मार्गांचे अनुयायी आहे. बापु, स्वामी, दादा, महाराज, शास्त्री, पंडित, माता, आई, अम्मा, अक्का, देवी इ.चे पेव फुटले आहे. हरिकथा, निरुपण, सप्ताह, प्रवचन, सत्संग, सहस्त्रचंडी, नवचंडी इ. यज्ञयागांचे छोटया छोटया गावांमधून केले जाणारे आयोजन त्याव्दारे जाळले जाणारे टनावधी तूप, ज्या निमित्ताने उभे राहणारे अर्थकारण व राजकारण यांचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. हया मार्गांच्या निमित्ताने समाजाचा मोठा वर्ग आध्यात्मिक क्षेत्राशी जोडला गेला आहे. प्रस्तुत नव भक्तीमार्गांमध्ये प्रामुख्याने उल्लेख करता येईल अशा काही संघटनांची नावे पुढील प्रमाणे :

1. संत आसाराम बापू– योग वेदांत सेवा समिती
2. गायत्री परिवार
3. सिध्दयोग ध्यान आश्रम
4. जगदगुरु श्री कृपालजी महाराज
5. सुधांशुजी महाराज
6. किरीट भाईजी
7. विश्वास मेडिटेशन
8. स्वामी समर्थ सेवा केंद्र
9. प्रजापिता ब्रहम कुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय
10. निर्मला माता–सहज योग
11. स्वामी नरेंद्राचार्य
12. श्री श्री रविशंकरजी – आर्ट ऑफ लिव्हिंग
13. संत मुरारी बापू
14. श्री रमेशभाई ओझा
15. स्वाध्याय परिवार
16. श्री संप्रदाय–नारायण विष्णु धर्माधिकारी

उपरोक्त सर्व बापू, महाराज, स्वामी, भाई, बाबा, माता इ. नावे जरी व्यक्तींची असलीत तरी ते विशिष्ट नवभक्ती मार्गाचे प्रमुख आहेत व त्यांच्या नावांनीच ते नवभक्ती मार्ग किंवा नव आधात्मिक संघटन प्रसिध्द आणि प्रचलित आहेत.

वर उल्लेखिलेले नवभक्ती प्रवाह हे केवळ प्रातिनिधिक स्वरुपातील आहेत. अशा प्रकारच्या नवभक्ती मार्गांची संख्या ही निश्चितच कितीतरी अधिक आहे. त्या सर्वांचा नामोल्लेख करणे प्रस्तुत नाही. केवळ एखाद्या तालुक्याचा विचार केला तरी देखील जवळ जवळ प्रत्येक भक्ती मार्गांची अनुयायी आढळतात. 'व्यक्ती तितके गुरु' अशी नवीन म्हण तयार होऊ शकेल अशी स्थिती आहे. प्रत्येक नवभक्ती मार्गाची स्वतःची अशी वैशिष्टये आहेत त्यांच्या मधून आपला वेगळेपणा जपण्याची आणि टिकवून ठेवण्याची जाणीवपूर्वक धडपड प्रत्येक मार्गाचे अनुयायी करतांना दिसतात. हा वेगळेपणा असला तरी सर्वच मार्गांची एकत्रितपणे काही समान वैशिष्टे देखील आढळतात.  कमी–अधिक हया सर्वच मार्गांना ती लागू होतात. ही काही वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील–

### *1.स्वरुप नवे तत्व जुने :*

हिंदू भक्ती संप्रदायांतील नव प्रवाहांचे अवलोकन करता त्यांचे तात्विक अधिष्ठान हे पारंपरिक भक्ती संप्रदायांमध्ये अथवा प्राचीन धार्मिक वाङ्मयामध्येच आढळते. केवळ नव्या स्वरुपातील मांडणी हया तत्वांची सदरचे नवप्रवाह करतात. नवीन शैली  आणि नवीन स्वरुप यामुळे नव्या पिढीतील मंडळी हया संप्रदायांकडे आकर्षित होतांना दिसतात. सोहम् तत्वमसि, परस्पर देवोभव, नियतं कुरु कर्मत्वं, सेवा परमो धर्म, उध्दरेदात्मानम्, इ.सारखी वैदिक, उपनिषदे वा भगवद्गीतेतील तत्वांना मूलतः स्वीकार करुन त्यांच्या पायावर आपल्या भक्तीमार्गाची उभारणी करतांना नव भक्ती प्रवाह व पर्यायाने त्यांचे अध्वर्यु अथवा प्रमुख दिसतात. ध्यान, योग, नामस्मरण, अग्निहोत्र, पठण, कीर्तन हयासारख्या प्राचीन भक्ती माध्यमांचा आधुनिक परिवेशाशी सुसंगत पध्दतीने वापर केला जातो व सदस्य भक्त जमा केले जातात.

### *2.प्राचीन भक्ती संप्रदायांचा एकत्रित वापर :*

वर्तमान काळातील नवभक्ती मार्गांचे हे एक महत्वाचे वैशिष्टय म्हणता येईला की हया मार्गांपैकी बऱ्याच मार्गांमध्ये पारंपारिक भक्ती संप्रदायातील भक्ती पध्दतीचा एकत्रितपणे वापर केला जातो विशेषतः पूर्वीच्या काळी अस्तित्वात शैव, वैष्णव, शाक्त, नाथ, दत्त, समर्थ, वारकरी इ. संप्रदायांमध्ये स्वतःची अशी स्वतंत्र भक्तीशैली होती. ही शैली त्या–त्या संप्रदायांनी जाणीवपूर्वक निर्माण वा विकसित केली होती. सांप्रदायिक स्वतंत्रता अथवा पृथकता जोपासण्यास यामुळे मदत झालेली होती. विशिष्ट संप्रदायाची विशिष्ट अशी अभिवादन, आसन, कीर्तन.संकीर्तन, उपासना पध्दती होती. केवळ आपल्या संप्रदायाच्या दैवताचेच पूजन व आराधना केली जात होती. हया पार्श्वभूमीवर वर्तमान नव भक्तीमार्गामध्ये मात्र बऱ्याच प्रमाणात शिथीलता आढळते. मूळ वैष्णव उपासना पध्दती जोपसणारा भक्ती मार्ग असला तरीही शिव नामाचे स्मरण, संकीर्तन करणे, एकादशी बरोबरच महाशिवरात्री सारखी शिव हया देवतेशी संबंधित व्रते करणे यासारखे उपक्रम राबविले जातात. नवभक्तीमार्गाच्या प्रमुखांची प्रवचने हया दृष्टीने सर्वस्पर्शी असल्याचे दिसते.

### *3.गुरुवाद अथवा व्यक्तीकेंद्रित भक्ती :*

नवभक्ती मार्गांच्या अनुयायांमध्ये प्रकर्षाने आढळणारी बाब म्हणजे त्यांची व्यक्तीकेंद्रित भक्ती होय. हया मार्गांच्या प्रमुखपदी असणाऱ्या व्यक्तीस पूजनीय मानून त्यांच्या प्रति भक्तीभाव प्रकट केला जातो. सदर व्यक्तीचा कृपाप्रसाद प्राप्त करणे हाच आध्यात्मिक साधनेचा अथवा उपासनेचा परमोच्च बिंदू मानला जातो.यातूनच आपल्या गुरुंची आरती करणे, त्यांच्या नावाचा जप किंवा संकीर्तन करणे, त्यांच्यासाठी विशेष प्रार्थना करणे, त्यांच्या रुपाचे ध्यान करणे. त्यांच्यासाठी थोडक्यात त्यांनाच ईश्वर मानून त्यांची आराधना करणे हया गोष्टींचे प्रचलन आढळते. बऱ्याच मार्गांमध्ये प्रमुखांच्या चमत्काराची आणि कृपेची वर्णने करणाऱ्या कथा, स्तोत्रे, काव्य इ. ची निर्मिती केलेली आढळते. अशा स्तोत्रांचे नियमित पठण करणारी मंडळी प्रस्तुत संप्रदायांमध्ये मोठया प्रमाणात आढळते.

हया सर्व प्रकारांचा परिणाम म्हणजेच एक प्रकारचा गुरुवाद बोकाळतो. मुख्या आध्यात्मिक व पारमार्थिक तत्वाची जागा सवंग व्यक्तीकेंद्रित भक्ती घेते. त्यातूनच अंधश्रध्दा आणि अविवेक यांचा उदय होतो. अकर्मण्यता निर्माण होते आणि कोणत्याही (मग ते अगदी क्षुल्लक असले तरी देखील) कारणाने अथवा हेतूसाठी आपल्या श्रध्दास्थानावर अवलंबित्वाची प्रवृत्ती वाढते. विनाकारणचा भावुकपणा, धर्मभोळेपणा या गोष्टी वाढीस लागतात. नवभक्ती मार्गाच्या अनुयायांनी त्यांच्या मार्गाच्या मासिक/पुस्तकात नोंदविलेल्या त्यांच्या गुरुकृपेच्या अनुभवांचे वाचन केले असता ही गोष्ट अत्यंत ठळकपणे जाणवते.

उदा. कृपेमुळे रेल्वे अथवा बस मध्ये बसावयास जागा मिळाली, कृपेमुळे एखाद्या आजारातून मुक्ती मिळाली, गुरुंच्या आशिर्वादाने लग्न जुळले, संतती प्राप्त झााली, नोकरी अथवा बढती मिळाली, बदली झाली, इ. बाबी गुरुकृपेचे अनुभव म्हणून सांगितल्या जातात.

वरील प्रतिक्रियांना आध्यात्मिक अनुभव आणि गुरुकृपेचा प्रसाद मानणे म्हणजेच हया मार्गातील अनुयांयांच्या भक्तीचा उद्देश काय आहे हे स्पष्ट होते. अशा प्रकारच्या व्यक्ती केंद्रित भक्तीमुळेच विशिष्ट व्यक्तींना देवत्वांचा दर्जा प्राप्त होतो. परमपूज्य, परमआराध्य, प्रातःस्मरणीय इ. विशेषने लावली जातात. त्यांची चित्रे, पोस्टर्स, फोटो इ. विकले जातात घर, ऑफिस, दुकाने यांसारख्या ठिकाणी लावले जातात लग्न पत्रिकेवर त्यांच्या कृपेचा जाणीवपूर्वक उल्लेख केला जातो, फोटो छापला जातो. विवाह, वास्तुशांती अथवा इतर मंगलकार्य प्रसंगी त्यांची आरती उतारली जाते. प्रत्यक्ष उपस्थित असल्यास पादप्रक्षालनासारखे विधी केले जातात व एक प्रकारे त्यांच्यातील देवत्व वाढविले जाते.

पारमार्थिक अथवा आध्यात्मिक उन्नती, सदगुण—सदाचार, अनुसरण, शांती यासारख्या उदात्त ध्येयांकडे काही प्रमाणात किंवा पूर्णतः दुर्लक्ष केले जाते व व्यक्तीपुजेला प्राधान्य दिल्याने व्यक्तीपूजेचे स्तोम माजते. अत्यंत थाटमाट व झगमगाटात, ऐश्वर्यसंपन्न वातावरणात गुरुंचे वाढदिवस साजरे केले जातात. त्यांचा दीक्षा दिवस, आत्मसाक्षात्कार दिन या सारखे दिवस पर्व म्हणून मान्यता पावतात. त्याप्रित्यर्थ प्रभात फेरी, दिंडी, भंडारा, प्रसाद वाटप, यासारखे उपक्रम वर्गणी जमा करुन राबविले जातात.

### *4.प्राचीन परंपरांचे उदात्तीकरण :*

हिंदूमध्ये धार्मिकदृष्टया महत्व प्राप्त करणाऱ्या प्राचीन परंपरा, रिवाज, उपासना पध्दती इ. चे उदात्तीकरण करुन आधुनिक काळत त्यांची उपयुक्तता कशी आहे हे पटविण्याचा प्रयत्न नवभक्तीमार्गांच्याव्दारे केला जातो. हवन, अग्निहोत्र, अर्ध्यदान इ. धार्मिक विधीची उपयुक्तता तसेच त्यामागील वैज्ञानिक तत्व सिध्द करण्याचा प्रयत्न नवभक्तीमार्गाच्याव्दारे केला जातो. विशेषतः अशा उपासना पध्दतीचे अवलंबन वा अनुसरण हया मार्गांच्या अनुयायांव्दारेच केले जाते. त्यांच्या प्रचार आणि प्रसारार्थ काही अनुयायी, प्रशिक्षक, स्वयंसेवक वा पुरोहित म्हणूनदेखील कार्य करतात. आपल्याच भक्तीमार्गातील अनुयायांच्या घरी जाऊन अथवा इतर व्यक्तींकडे देखील आपल्या पध्दतीच्या विशिष्ट उपासना संपन्न केल्या जातात. हया मागे भक्तीमार्गप्रसाराचा मुख्य उद्देश असतोच या दृष्टीने गायत्री परिवारांचे उदाहरण उल्लेखनिय म्हणून सांगता येईल विविध प्रकारची धार्मिक कर्मे, संस्कार इ. करण्यासाठी विशेष प्रशिक्षित अनुयायी पुढाकार घेतांना दिसून येतात अशा प्राचीन परंपरा कर्मकांडे व उपासना पध्दतीचे धर्मशास्त्रोक्त प्रशिक्षण देण्याची विशेष व्यवस्था देखील हरिव्दार येथील शांतीकुंज या मुख्य आश्रमात केलेली आहे. विशेष म्हणजे स्त्रिया देखील अशा प्रकारची प्रशिक्षण घेतात व धार्मिक कर्मकांडे संपन्न करु शकतात.

### *5 योग प्रधानता :*

वारकरी पंथासारख्या भक्ती संप्रदायांनी भक्तीमार्गातील गूढता, योग, रहस्यात्मकता इ. मुळे त्यांस प्राप्त झालेले एक वेगळेपणाचे वलय नष्ट करुन क्लिष्ट असा यौगिक स्वरुपाचा भक्तीमार्ग अव्हेरुन अनुसरण्यास सुलभ असा भक्तीमार्ग प्रस्थापित केला व त्यामुळेच बहुजन समाज व समाजातील सर्वसामान्य जनता भक्तीमार्गाकडे वळली. सांप्रत काळातील नवभक्ती मार्ग मात्र आपल्या भक्तीमार्गांत, उपासना पध्दतीत यौगिक मार्गाला प्राधान्य देतांना आढळतात व विशेष म्हणजे पूर्वी ज्या यौगिक क्लिष्टतेमुळे बहुजन समाज भक्ति आणि धार्मिकतेपासुन दुरावला होता तीच यौगिक क्लिष्टता तोच बहुजन समाज नवभक्तीमार्गांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात स्वीकारतांना किंवा अनुसरतांना दिसतो आहे.

कुंडलिनी शक्तीचे जागरण, शक्तिपात, षडचक्रांचे भेदन, निरनिराळया योगमुद्र, आसन, बंध, क्रिया इ. ची रेलचेल नवभक्तीमार्गामध्ये मोठया प्रमाणात दिसून येते काही विशिष्ट नवभक्तीमार्ग तर विशिष्ट योगासाठी प्रसिध्द आहेत.

उदा. 1 सिध्दयोग व सहजयोगातील शक्तिपात आणि कुंडलिनीशक्तीचे जागरण
2 आर्टस् ऑफ लिव्हिंग मधील सुदर्शन क्रिया

वरील प्रकारे योगाचे अथवा तत्सम मार्गांचे अनुसरण केल्यास आध्यात्मिक प्रगतीबरोबरच शारिरिक व मानसिक स्वास्थ्याचाही लाभ होतो असा दावा आणि प्रचार संबंधित नवभक्तीमार्गाकडून केला जातो. त्यानुषंगाने अनुयायांना मार्गदर्शन केले जाते व आचरण खान—पान, दिनचर्या इ. विषयक नियम देखील सांगितले जातात.

योग प्राधान्यामुळे सर्वसाधारण वा कनिष्ठ स्तरातील अनुयायी नवभक्तीमार्गाकडे लवकर व फारसे आकृष्ट होत नाहीत. झालेच तरी आपल्या नित्यक्रमात आरती, नामस्मरण यासारख्या सोप्या व सुलभ उपासनांचाच अंतर्भाव ते सहसा करतात. नवभक्तीमार्गाचे अनुसरण करणारे श्रीमंत व उच्च व मध्यमवर्गीय अनुयायी मात्र आपल्या दैनिक साधनेमध्ये आपल्या सप्रदायाच्या यौगिक क्रियांचा जाणीवपूर्वक समावेश करतात.

### *निष्कर्ष :—*

नवभक्तीमार्गांमुळे हिंदू समाजात धार्मिकता वाढण्यास मदत होत आहे. विविध नवभक्तीमार्गांच्या प्रमुख गुरुंच्या रुपाने नवीन श्रध्दास्थाने निर्माण झालेली आहेत. नवे धार्मिक आदर्श व उदिष्टे यांची जोपासना करणारा फार मोठा वर्ग हिंदू समाजात निर्माण झालेला आहे. व्यक्तिकेंद्रित भक्ती किंवा गुरुवाद बोकाळला असुन विविध नवधार्मिक संघटनांच्या अनुयायांमध्ये स्वसमूहश्रेष्ठतावादाची जोपासना सुध्दा झालेली आहे. प्राचीन वा पारंपारिक भक्ती मार्गांच्या बैठकीतच आधुनिक नवभक्ती प्रवाहांची जडण—घडण झालेली असुन नवभक्तीप्रवाहांमधील व्यक्तीकेंद्रित भक्तीमुळे अंधश्रध्दांना पोषक वातावरण निर्माण झालेले आहे. समाजाच्या विशिष्ट वर्गात विशेषतः नवभक्तीमार्गांच्या अनुयायामध्ये कर्मकांडाचे प्रचलन देखील वाढलेले आहे.

### *संदर्भ :*

1.पुंडलिक विद्याधर, 2003, धर्माचे समाजशास्त्र, पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
2.गोसावी र.रा.,1998, पाच भक्तीसंप्रदाय, पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस
3-Desai A.R., 1993, Modern Godmen in India, Bombay : Popular
4-Robinson Rowena, 2004, Sociology of Religion in India, New Delhi : SAGE
5.ऋषी प्रसाद, मासिक पत्रिका, योग वेदांत सेवा समिती
6.नीलेश्वरी , मासिक पत्रिका, चित्शक्ती बुक ट्रक्ट
7-http://www.totalbhakti.org
8-http://www.syda.org
9-http://www.ashram.org

# Publish Research Article

**International Level Multidisciplinary Research Journal**

## For All Subjects

*Dear Sir/Madam,*

*We invite original unpublished research paper. Summary of Research Projetc, Theses, Books and Books Review of publication, You will be pleased to know that our journals are..*

**Associated and Indexed, India**

- *OPEN J-GATE*
- *International Scientific Journal Consortium Scientific*

**Associated and Indexed, USA**

- Google Scholar
- DOAJ
- EBSCO
- Index Copernicus
- Academic Journal Database
- Publication Index
- Scientific Resources Database
- Recent Science Index
- Scholar Journals Index
- Directory of Academic Resources
- Elite Scientific Journal Archive
- Current Index to Scholarly Journals
- Digital Journals Database
- Academic Paper Database
- Contemporary Research Index

Indian Streams Research Journal
258/34, Raviwar Peth Solapur-413005, Maharashtra
Contact: 9595359435
E-Mail- ayisrj@yahoo.in / ayisrj2011@gmail.com
Website: www.isrj.net